| | |
|---|---|
| MHRG130006682023 | **फौजदारी चौकशी अर्ज क्र.१२७/२०२३**<br>**सौ. सुप्रिया रविंद्र भाटकर व १**<br>**विरुध्द**<br>**रविंद्र संतोष भाटकर वगैरे ३** |

## निशाणी क्र.५ खालील आदेश

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५ मधील तरतुदीनुसार कलम २३ प्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्याकरिता दाखल केला आहे.

**अर्जदारांचे कथन थोडक्यात पुढील प्रमाणे :-**

०२. अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह दिनांक १६/०५/२०१० रोजी हिंदु धर्मशास्त्र व रितीरिवाजाप्रमाणे मौजे निगडी काठी, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथे झालेला आहे. विवाहाच्या वेळी सामनेवाला क्र.१ हा भाईंदर येथे कामाला होता. त्यामुळे लग्नानंतर अर्जदार क्र.१ या सामनेवाला क्र.१ सोबत त्यांच्या भाईंदर येथे राहत होत्या.

०३. विवाहपश्चात अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र.१ यांनी काही दिवस सुखाने संसार केला. विवाहानंतरचे काही दिवस सुखाने गेल्यावर सामनेवाला क्र.१ ने रंग दाखवायला सुरुवात केली. सामनेवाला क्र.१, २ व ३ हे अर्जदार क्र.१ हिस लहान-सहान गोष्टींवरुन मारहाण व शिवीगाळ करु लागले. तसेच अर्जदाराच्या माहेरील लोकांचा येता-जाता अपशब्द वापरुन उध्दार करु लागले. तसेच त्यांच्यामध्ये छोट्या छोट्या कारणांवरून वाद होऊ लागले. सामनेवाला क्र.१ हा नेहमीच अर्जदार क्र.१ यांच्या पासून दूर राहत असे, कधी ही व्यवस्थित बोलत नसे, कधीही पतीचे प्रेम दिले नाही, नेहमीच वैवाहिक सुखापासून वंचित ठेवले. सामनेवाला क्र.१ हा अर्जदार क्र.१ वर नेहमीच नाराज असत. अर्जदार क्र.१ यांच्या बरोबर अंतर ठेवून वागत, इतका सगळा त्रास सहन करुनही अर्जदार क्र.१

ही समानेवाला क्र.१ याचे बरोबर तो आज ना उदया सुधारेल या आशेवर संसार करीत होती. परंतू तरीही सामनेवाला क्र.१ यांच्या स्वभावात कोणताही फरक पडला नाही. अर्जदार क्र.१ ही केवळ आपला संसार टिकवण्याकरीता सामेनवाला क्र.१ याचे सोबत सामंजस्याचे धोरण स्विकारुन जीवन व्यथित करीत होती. सामनेवाले यांनी लग्न हे कर्ज काढून केले होते. तसेच सामनेवाले व अर्जदार क्र.१ हे राहत असलेली रूम देखील भाडयाची होती. कर्ज काढलेले असल्याने सदरचे कर्ज देणारे व रूमचे मालक पैसे मागण्याकरिता सतत घरी येत असत. त्या सर्व गोष्टींचा राग सामनेवाले हे अर्जदार क्र.१ यांचेवर काढत असत. तसेच सामनेवाला क्र.१ यांची रिक्षा देखील लोनवर घेतलेली होती. सदर रिक्षाचे हप्ते अर्जदार क्र.१ यांनी त्यांच्या माहेरून पैसे आणून भरावेत याकरिता अर्जदार क्र.१ हिच्यावर दबाव टाकित असत. त्यावेळी अर्जदार क्र १ यांनी नकार दिल्यावर सामनेवाले क्र. ४ यांनी सामनेवाला क्र १ यास अर्जदार क्र १ यांचेकडून त्यांचे स्त्रीधन (सोन्याचे कानातले ३ जोड, ४ अंगठ्या, मोठे मंगळसूत्र इ.) मागून घेण्यास सांगितले त्यानुसार सामनेवाला क्र. १ यांनी अर्जदार क्र १ चे स्त्रीधन घेवून सामनेवाला क्र ४ यांचेकडे दिले. सदरच्या दागिन्यांचे सामनेवाला क्र ४ यांनी काय केले त्याबाबत अर्जदार क्र १ यांना काही समजू दिले नाही.

०४. अर्जदार क्र.१ चे पुढे असे कथन की, अर्जदार क्र.१ ने घरात केलेले कोणतेही काम सामनेवाला क्र. ३ यांस पटत नसे. सामनेवाला क्र. ३ हे नेहमी अर्जदार क्र. १ यांनी केलेल्या कामावरून सामनेवाला क्र. १ कडे तक्रार करित असत. तसेच तयार केलेले जेवण व्यवस्थित झालेले नाही , कपडे धुवायला जास्त पाणी व साबण लागतो, जाणूनबुजून कामाची टाळाटाळ करते असे सांगुन सामनेवाला क्र.३ हे सामनेवाला क्र.१ यांना भडकावित असत. त्यावरून सामनेवाला क्र.१ हा अर्जदार क्र १ यांनामारहाण व शिवीगाळ करीत असत. ऑक्टोबर २०१० मध्ये अर्जदार क्र. १ हया गरोदर राहिल्या असताना त्यांना कष्टाची कामे करण्यास डॉक्टरांनी मज्जाव केला असता त्याचा राग मनात धरुन

सामनेवाला क्र. ३ यांनी अर्जदार क्र. १ ला अनेक वेळेला उपाशी देखील ठेवले. त्या उपासमारीमुळे अर्जदार क्र. १ यांची तब्येत बिघडल्यावर सामनेवाला क्र. १ अर्जदार क्र. १ यांना डॉक्टर कडे न नेता तु तुझ्या माहेरी जा आणि उपचार कर असे म्हणाला. डॉक्टांनी अर्जदार क्र. १ यांस फळ व ताज्या अन्नाचे सेवन करावयास सांगितले असून देखील सामनेवाला क्र. ३ ने अर्जदार क्र. १ हिस जाणूनबुजून शिळे अन्न जेवावयास दिले. सरतेशेवटी होणाऱ्या त्रासाला कंटाळून व आपल्या बाळाच्या सुरक्षिततेचा विचार करून अर्जदार क्र. १ हया गरोदरपणाच्या ८ महिन्यात आपल्या माहेरी निघून आल्या. त्यानंतर दि. २८/०६/२०११ ला अर्जदार क्र. १ व सामनेवाला क्र. १ यांना श्रेया नावाची कन्या झाली. त्यावेळी अर्जदार क्र. १ यांच्या बाळंपणाचा सर्व खर्च अर्जदार क्र. १ यांच्या माहेरील मंडळीनी केला. सप्टेंबर २०११ ला सामनेवाला क्र. १ हे अर्जदार क्र. १ व २ यांना घेवून घरी आले. त्यानंतर साधारण २ ते ३ महिने चांगले गेल्यानंतर पुन्हा सामनेवाले यांनी अर्जदार क्र. १ यांना छोटया मोठ्या गोष्टीवरून त्रास देण्यास चालू केले.

०५. अर्जदार क्र.१ चे पुढे असे कथन की, सन २०१३ मध्ये अर्जदार क्र. २ (श्रेया) आजारी असल्याकारणाने सतत रडत असे. ज्यावेळी अर्जदार यांनी ही गोष्ट सामनेवाला क्र. १, २ व ३ यांना सांगितली त्यावेळी त्यांनी यांनी अर्जदार क्र. १ ला उडवाउडवीची उत्तरे दिली व अर्जदार क्र. २ हिच्यावर वैद्यकीय खर्च करण्याकरिता आम्ही तयार नाही, अर्जदार क्र २ हि मेली तरी चालेल पण आम्ही सोबत येणार नाही असे ठामपणे बजावले. त्यावेळी अर्जदार क्र. १ यांनी अर्जदार क्र.२ हिस घेवून हॉस्पीटलमध्ये घेवून गेल्या. त्यावेळी अर्जदार क्र. २ हिस स्किन इन्फेक्शन झाले असल्याचे समजले व त्यावेळी औषधाकरिता पैसे नसल्याने अर्जदार क्र. १ यांनी सामनेवाला क्र. १ यास फोनद्वारे संपर्क साधला व पैशाची मागणी केली असता सामनेवाला क्र. १ ने पैसे देण्यास नकार दिला व अर्जदार क्र. १ यांना शिवीगाळ करुन जावून जीव दे असे म्हणाला. त्यानंतर अर्जदार क्र. १

हया अर्जदार क्र. २ हिस घरी घेवून आल्या. त्यावेळी सामनेवाला क्र. १ व ३ यांनी अर्जदार क्र.१ यांना मारहाण केली. सदरच्या आजारातून अर्जदार क्र २ हि बरी झाल्यानंतर पुन्हा दोन महिन्यांनी व्हायरल ताप व फुड पॉयजन यानी आजारी पडली. त्यावेळी अर्जदार क्र. २ हिस परेल येथील वाडीया हॉस्पीटल येथे ५ दिवसाकरिता ॲडमिट करण्यात आले. त्यावेळी देखील सामनेवाले यांनी हॉस्पीटलचा खर्च करण्यास नकार दिला. त्यावेळी हॉस्पीटलचा सर्व खर्च अर्जदार क्र. १ यांच्या माहेरील मंडळींनी केला. तद्नंतर अर्जदार क्र. १ हया घरी आल्यावर अर्जदार क्र. २ यांच्या सततच्या आजारपणाचा दोष सामनेवाले हे अर्जदार क्र. १ यांना देत असत व त्यामुळेच अर्जदार क्र. १ यांना घरातून बाहेर काढत होते त्यावेळी घडलेला सर्व प्रकार अर्जदार क्र १ यांनी त्यांच्या माहेरील मंडळींना कळवला.

०६. अर्जदार क्र.१ चे पुढे असे कथन की, त्यानंतर अर्जदार क्र. १ यांच्या माहेरील मंडळींनी समेट करण्याकरीता सामनेवाला क्र. १ यांच्या घरच्यांची मिटींग घेतली. त्यावेळी अर्जदार क्र १ हिच्या बाबत होत असलेला सर्व प्रकार अर्जदार क्र. १ यांनी मिटींगमध्ये कथन केला. त्यावेळी दोन्ही पक्षांच्या बाजू ऐकून सामनेवाले यांनी अर्जदार क्र. १ हिस प्रेमाने वागवा अशी समज दिली. त्यानंतर अर्जदार ह्या पुन्हा सासरी गेल्या. सामनेवाला यांनी थोडेदिवस अर्जदार क्र. १ यांना चांगली वागणूक देवून काही दिवसांनी पुन्हा त्रास देण्यास सूरूवात केली. अशाप्रकारच्या मिटींग ५ ते ६ वेळा घेण्यात आल्या. सरतेशेवटी होणाऱ्या त्रासाला कंटाळून अर्जदार क्र १ हया अर्जदार क्र २ हिस घेवून त्यांचा भाऊ रूपेश सुरेश कनगुटकर यांचेकडे निघून आल्या. त्यानंतर अर्जदार क्र १ यांचे आई–वडिल हे अर्जदार क्र. १ व २ यांना घेवून माहेरी घेवून आले. तद्नतर डिसेंबर २०१७ मध्ये मध्ये अर्जदार क्र २ हिचा विचार करून अर्जदार क्र. १ हया पुन्हा सासरी निघून आल्या. थोडेदिवस अर्जदार क्र. १ यांना चांगली वागणूक दिल्यावर काही दिवसांनी पुन्हा त्रास देण्यास सामनेवाले यांनी सुरूवात केली, त्यावेळी अर्जदार क्र १ या नोकरी

करत असत. अर्जदार क्र २ यांना सामनेवाला क्र २ व ३ हे सांभाळत नसल्याने अर्जदार क्र २ हिस अर्जदार क्र. १ हया पाळणाघरात ठेवून कामाला जात असत. लॉकडाऊन च्या काळात सर्व खर्च अर्जदार क्र १ हया करत असून घर सांभाळत होत्या. दरम्यानच्या काळात पैशाची टंचाई असल्याने सामनेवाला क्र १ हा अर्जदार क्र १ यांना पैसे नसतील तर भीक माग, घर सोडून जा असे टोचून बोलत असत. त्यानंतर सप्टेबर २०२१ मध्ये सामनेवाला क्र १ यांनी अर्जदार क्र १ व २ यांना अर्जदार क्र १ यांच्या भावाकडे अंधेरी येथे सोडले व दिवाळीमध्ये अर्जदार क्र. १ यांना फोनकरून "मी माझ्या मुलीला घ्यायला येत आहे तु तिथेच राहा मी फक्त माझ्या मुलीला घेवून जाईन" असे ठामपणे सांगितले. त्यावर अर्जदार क्र १ यांनी " सणासुदीला मी काय माहेरी पडून राहू का, सर्व शेजारील लोक मला विचारत आहेत. त्यामुळे मी देखील तुमच्या सोबत येते" असे सांगितले. त्यावर सामनेवाला क्र. १ यांनी अर्जदार क्र. १ यांना शिवीगाळ करून सोबत घेवून जाण्यास नकार दिला व त्याच रागात अर्जदार क्र २ हिस जबरदस्तीने घेवून गेले. ऑक्टोबर मध्ये अर्जदार क्र १ यांची आजी मरण पावली. तेव्हा सर्व गावी गेले परंतु अर्जदार क्र २ हिस सामनेवाला क्र १ घेवून आले नाहीत. त्यावेळी अर्जदार क्र २ हि अर्जदार क्र १ यांचेकडे गेली नाही व त्यांच्याशी बोलली देखील नाही. सामनेवाले यांनी अर्जदार क्र २ हिस अर्जदार क्र १ यांच्याविरूद्ध भडकावले होते. त्यानंतर अर्जदार क्र. १ व २ हे अंधेरी येथे अर्जदार क्र. १ यांच्या भावाकडे निघून आल्या व तेव्हापासून आजतागायत आई वडिलांकडे निगडी येथे माहेरी राहत आहेत. माहेरी आल्यानंतर अर्जदार यांनी आपल्या वकिलांमार्फत सामनेवाला यांना दि १२/०६/२०२३ रजिस्टर नोटीस पाठविली, त्या रजिस्टर नोटीस ला सामनेवाला यांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

०७. अर्जदार ही सदयस्थितीत आर्थिकदृष्टया पुर्णतः आपल्या वडिलांवर अवलंबुन आहे. अर्जदार ही कोणतीही नोकरी अथवा व्यवसाय करीत नाही. तिला तिचा दैनंदिन खर्च भागविण्यासाठी पुर्णतः आपल्या वडिलांवर अवलंबुन राहावे

लागत आहे. अर्जदाराच्या वडिलांची अर्थिक परिस्थिती देखिल हालाखिची असल्याने अर्जदार यांची परिस्थिती अत्यंत दयनिय झाली आहे. अर्जदार यांस उदरर्निवाहाचे कोणतेही साधन नाही. याउलट सामनेवाला क्र १ हा भाईंदर येथे कामाला आहे. त्यातून त्याला दरमहा अंदाजे ३० ते ३५ हजार रुपये मिळतात. त्यामुळे सामनेवाला क्र १ याने अर्जदार क्र १ व २ यांचे पालनपोषण करणे गरजेचे आहे. अर्जदार क्र १ व सामनेवाला क्र १ यांचे नाते संबंध पाहता अर्जदार क्र १ व २ यांचे पालनपोषण करण्याची सामनेवाला क्र १ हयाची नैतिक जबाबदारी आहे. सबब, सामनेवाला क्र.१ ने अर्जदारास दरमहा १५,०००/- इतकी पोटगी देण्याची विनंती अर्जदारांनी केली आहे.

**सामनेवालांचे म्हणणे थोडक्यात पुढील प्रमाणे :-**

०८. सामनेवाला यांनी निशाणी १४ येथे म्हणणे दिलेले आहे. सामनेवाला यांच्या कथनानुसार त्यांनी अर्जदार क्र. १ व सामनेवाला क्र. १ यांचा विवाह दिनांक १६ मे २०१० रोजी निगडीकाठी, ता. श्रीवर्धन, जि. रायगड या ठिकाणी हिंदूधर्मशास्त्रप्रमाणे संपन्न झाला होता. सदरचा विवाह हा त्यांचे कुटूंबियांचे संमतीने पार पडलेला व्यवस्था विवाह होता. सामनेवाला हा विवाहाच्यावेळी भाईंदर येथे काम करीत होता व विवाहानंतर सामनेवाला क्र.१ अर्जदार क्र. १ हे भाईंदर येथे राहत होते. सामनेवाला याने त्यांचे लग्न कर्ज काढून केले होते व तो भाडयाच्या रुममध्ये राहत होता, सन २०१३ मध्ये अर्जदार क्र. २ कु. श्रेया ही आजारी होती, दिनांक १ ऑक्टोबर २०१० रोजी गरोदर राहिली होती, सामनेवाला क्र. १ याने त्याची रिक्षा कर्जावर घेतलेली होती, तसेच अर्ज परिच्छेद क्रमांक १२ मधील मजकूर या बाबी केल्या आहेत. सामनेवालांच्या कथनानुसार सामनेवाला क्र.१ यास दरमहा ३० ते ३५ हजार रुपये कमावितो हे कथन पुर्णपणे तथ्यहीन व असत्य असून याबाबत सामनेवाला याचे म्हणणे असे की, सामनेवाला क्र. १ हा रिक्षा चालविण्याचा व्यवसाय करीतो. त्याचेवर सामनेवाला क्र. २ व ३ या त्याचे वृध्द वडील व आई यांचे पालनपोषणाची व औषधोपचाराची पूर्णपणे जबाबदारी

आहे. सामनेवाला क्र. १ याचे मासिक उत्पन्न जेमतेम रुपये १० ते १५ हजार इतकेच असून याचा उत्पन्नातून त्याला घर भाडयासह रिक्षाचे कर्ज हप्ते व संसारीक खर्च उचलावा लागत आहे इत्यादी बाबी मान्य करुन इतर सर्व बाबी नाकारल्या आहेत.

०९. अर्जदार क्र. १ व २ यांचा सांभाळ करण्यास व त्यांचे जबाबदारी घेण्यास सामनेवाला क्र. १ याने कधीच कसूर केली नाही. परंतू अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ हीला घेवून स्वतःचे मर्जीने सामनेवाला क्र. १ याचा त्याग करुन गेलेली असून अर्जदार क्र. १ व सामनेवाला क्र. १ हे आता विभक्त झालेले आहेत व त्यांनी त्यांचा विवाह परस्पर मर्जीने संपुष्टात आणला आहे.

१०. सामनेवाला क्र.१ व अर्जदार क्र.१ यांचा विवाह हा व्यवस्था विवाह होता. सदर विवाह अर्जदार क्र.१ हीचे माहेरच्या मंडळींनी पूर्णपणे चौकशी करुन ठरविलेला होता. विवाहवेळी सामनेवाला क्र. १ हा रिक्षा चालविण्याचा व्यवसाय करतो त्याची रिक्षा कर्जाने घेतलेली आहे. तो आपले आईवडीलांबरोबर भाडयाचे खोलीत त्यावेळी भाईंदर येथे राहत होता याबाबतची कोणतीही वास्तव परिस्थीती लपविलेली नव्हती. अर्जदार क्र. १ व तिचे माहेरच्या मंडळींना या परिस्थीतीची पूर्ण कल्पना होती. विवाहानंतर अर्जदार क्र. १ ही तिचे सासरी आल्यावर सामनेवाला क्र. १ तसेच सामनेवाला क्र. २ ते ४ यांनी अनुक्रमे पत्नी म्हणून व घरची सून म्हणून तसेच एक स्त्री म्हणून तिचा नेहमीच सन्मान ठेवला. तिची योग्य ती काळजी घेणे. तिची हौसमौज भागविणे याकरीता सामनेवाला क्र. १ हा खूप मेहनत घेत होता. परंतू वाढत्या महागाईमुळे संसारात नित्यनियमाने येणाऱ्या अडचणी कमी करण्याकरीता अर्जदार क्र. १ ही स्वतःचे मर्जीने कामाला जावू लागली. अर्जदार क्र. १ हीचा स्वभाव उधळा असून इतरांकडे पाहून आपला संसार असावा अशी मोठी स्वप्न ती नेहमी पाहत असे. अशा वास्तवास धरुन नसलेली स्वप्ने पाहू नयेत, आपली परिस्थीती हळूहळू सुधारेल असे सामनेवाला

क्र.१ हा तिला नेहमीच समजावित असे. परंतू अर्जदार क्र.१ ही कोणतेही प्रकारची तडजोड करण्यास तयार नसे. तिच्या खर्चिक स्वभावामुळे सामनेवाला क्र. १ यास संसाराची आर्थिक गणिते जुळविणे कठीण जात होते. पुढे अर्जदार क्र. २ श्रेया ही शाळेत जावू लागल्यावर देखील अर्जदार क्र. १ हीचा तिला इंग्रजी माध्यमाच्या महागड्या शाळेत टाकण्याचा हट्ट होता. परंतू अंथरुण पाहून पाय पसरावे या उक्तीनुसार सामनेवाला क्र.१ हा काटकसरीने व परिस्थितीचे भान ठेवून व्यवहार करणारा व्यक्ती असल्यामुळे त्याने असे करण्यास नकार दिला. याचा देखील अर्जदार क्र.१ ने मनी रोष बाळगला होता. या व अशा गोष्टीमुळे सामनेवाला क्र. १ व अर्जदार क्र. १ यांचेमध्ये तात्विक वाद होत असे. परंतु अशा वादास मोठ्या भांडणाचे स्वरुप देणे, सामनेवाला क्र. १ याला सोडून वारंवार माहेरी निघून जाणे अशी कृत्ये अर्जदार क्र. १ हीचकडून वारंवार घडत होती. अर्जदार क्र. २ कु. श्रेया हिचा वेळोवेळी औषधोपचाराचा खर्च हा सामनेवाला क्र. १ यानेच केला होता व ते त्याचे कर्तव्य असल्याची पूर्ण जाणीव त्याला होती व आहे. तसेच सामनेवाला क्र. २ व ३ यांनी अर्जदार क्र. २ हया त्यांच्या नातीचा प्रेमाने सांभाळ केला होता. अर्जदार क्र.१ हीला तिचे सासरच्या मंडळींकडून कधीही कोणत्याही प्रकारची मारहाण, शिवीगाळ केली गेलेली नाही.

११. अर्जदार क्र.१ हीला वारंवार सामनेवाला क्र. १ यांचे घर सोडून जाण्याची सवय जडली असल्यामुळे तसेच तिचे असे वागण्यामुळे अर्जदार क्र.२ ही सामनेवाला क्र. १ याचेपासून दुरावू लागली होती. सन २०२१ मध्ये अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ हीला घेवून तिचे माहेरी निगडी येथे निघून गेली. सामनेवाला क्र. १ याने तिच्याशी वारंवार संपर्क साधून घरी परत येण्याची आर्जवे व विनंती केली. परंतु अर्जदार क्र. १ ही सामनेवाला क्र. १ याचे घरी येण्यास तयार नव्हती. तद्नंतर सन २०२३ मध्ये तब्बत दोन वर्षानंतर सामनेवाला क्र. १ व अर्जदार क्र. १ यांचे घरातील वरीष्ठ मंडळी व समाजातील मंडळी यांचेमध्ये एकत्रित बैठक झाली. या बैठकीमध्ये सामनेवाला क्र. १ व अर्जदार क्र. १ यांनी त्यांचा दिनांक

१६ मे २०१० रोजी संपन्न झालेला विवाह परस्पर संमतीने साक्षीदारांच्या समक्ष संपुष्टात आणण्याचा निर्णय घेतला. तद्नंतर असा विवाह संपुष्टात आणण्याकरीता सामनेवाला क्र. १ व अर्जदार क्र. १ यांनी दिनांक १७ जानेवारी २०२३ रोजी रुपये १००/– किंमतीच्या स्टॅम्पपेपरवर लिहीलेल्या घटस्फोट दस्तावर स्वतःच्या मर्जीने आपापल्या स्वाक्षऱ्या केल्या. सदरचे दस्तावर साक्षीदार म्हणून त्यांचे कुटूंबिय व समाजातील व्यक्तींनी देखील स्वाक्षरी केल्या आहेत. या दस्तात नमूद अटी शर्तीनुसार अर्जदार क्र. १ हीने सामनेवाला क्र. १ याचेकडून पोटगी मागण्याचा हक्क कायमस्वरुपी सोडून दिलेला आहे. तसेच अशा पोटगीकरीता कोणत्याही न्यायालयामध्ये अर्ज दाखल न करण्याचे मान्य केलेले आहे. सदरचे घरस्फोट दस्तामध्ये परिच्छेद क्र. ७ मध्ये अर्जदार क्र. १ हीने अर्जदार क्र २ हीचे संपूर्ण पालनपोषणाची जबाबदारी स्वीकारलेली आहे. परिच्छेद क्र. ८ मध्ये अर्जदार क्र. २ हीला सामनेवाला क्र. १ यांने तिचे वडील म्हणून भेटण्याचा, सणावारीला व वाढदिवसाचे वेळी भेट देण्याचा, अर्जदार क्र. २ हीची इच्छा असल्यास तिला आपले घरी घेवून जाण्याचा, तसेच तिला फोन कॉल सामनेवाला क्र. १ यांचे अधिकार देखील मान्य केलेले आहेत. परंतू अर्जदार क्र. १ हीने यातील सर्व अटी शर्तीचा भंग केलेला आहे. आता अर्जदार क्र. १ हीने अर्जदार क्र. २ या तिच्या अज्ञान मुलीचा हया फौजदारी चौकशी अर्जामध्ये अर्जदार म्हणून समावेश करुन जाणुनबुजून सामनेवाला यांना त्रास देण्याचा कुटील हेतू मनी बाळगून त्यांची बदनामी करणे व न्यायालयीन कारवाई करुन त्यांना आर्थिक भुर्दंड व मानसिक त्रास देणे हया एकाच उद्देशाने मे. न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जात केलेले सव आरोप व कथने ही खोटी व रचनात्मक असून या सामनेवालास ती अजिबात मान्य नाहीत कबूल नाही. त्यामुळे सामनेवाला यांनी अर्जदाराचा अर्ज नामंजूर होण्याची विनंती केली आहे.

१२. अर्जदारांतर्फे विद्वान वकील श्री. अतुल चौगुले व सामनेवांला तर्फे विद्वान वकील श्री. संजीव डेगवेकर यांचा युक्तीवाद ऐकला, संचिकेवर दाखल

कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार क्र.१ च्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदार क्र.१ ने तिच्या अर्जामध्ये सामनेवाले यांनी तिच्यावर केलेल्या कौटुंबिक हिंसाचारांच्या घटनांचे विस्तृतपणे वर्णन केलेले आहे. अर्जदार क्र.१ ने तिच्या अर्जात सामनेवाला क्र.१ ते ३ हे तिला लहानसहान गोष्टींवरुन शिवीगाळ, मारहाण करत होते. तिच्या माहेरच्या लोकांना अपशब्द वापरत असे. सामनेवाला क्र.१ हा अर्जदार क्र.१ कडे रिक्षाच्या कर्जाचे हप्ते फेडण्यासाठी माहेरुन पैसे आणण्यासाठी दबाव टाकत असे, तिचे स्त्रीधनही काढून घेतले आहे. तिला उपाशीपोटी ठेवत असे तसेच ती आजारी पडल्यावर तिला वैद्यकीय उपचार देत नसे. सामनेवाला यांनी अशा वेगवेगळया कारणांवरुन अर्जदार हिचा शारिरीक व मानसिक छळ करुन कौटुंबिक हिंसाचार केलेला आहे असे अर्जदार क्र.१ च्या अर्जातील कथनांवरुन प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

१३. अर्जदार क्र.१ ने असे कथन केले आहे की, ऑक्टोबर २०२१ मध्ये सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिला तिच्या आजीच्या मरणोत्तर कार्यासाठी माहेरी आणले होते व पुन्हा परत नेले नाही. त्यामुळे अर्जदारास नाईलाजाने तिला तिचे माहेरी राहावे लागत आहे. त्यानंतर सामनेवाला क्र.१ याने अर्जदार व तिच्या मुलीला परत नांदायला नेले नाही किंवा त्यांच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केलेली नाही. यावरुन असे दिसुन येते की, सामनेवाला क्र.१ यांचे सदरचे कृत्य हे अर्जदारांची आर्थिक पिळवणुक करणे यामध्ये मोडते व ते कौटुंबिक हिंसाचार याच्या संज्ञेत समाविष्ट आहे. त्यामुळे याही कारणास्तव सामनेवाला यांनी अर्जदार क्र.१ चा कौटुंबिक हिंसाचार केला असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

१४. सामनेवाला क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिचा पती व अर्जदार क्र.२ चे वडील आहे. त्यामुळे पती व वडील या नात्याने अर्जदार क्र.१/पत्नीचे व अर्जदार क्र.२/मुलीचे संगोपन करणे हे सामनेवाला क्र.१ चे कायदेशीर व नैतिक दायित्व आहे. परंतु, सामनेवाला क्र.१ याने अर्जदारांच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय

केली नसल्याचे दिसुन येत आहे. आज रोजी अर्जदार क्र.१ हिस उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही, ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे असे अर्जातील कथनांवरुन प्रथमदर्शनी दिसुन येते. याउलट अर्जदाराच्या कथनानुसार सामनेवाला क्र.१ हा नोकरी करत असून त्याला दरमहा रुपये ३० ते ३५ हजार इतका पगार आहे. परंतु, सामनेवाला क्र.१ याने सदरची बाब नाकारली असून त्याला केवळ रुपये १० ते १५ हजार दरमहा उत्पन्न मिळते असे त्याने कथन केले आहे. सामनेवाला क्र.१ याने त्याच्या उत्पन्नाबाबत व दायित्वाबाबत कोणतेही शपथपत्र दाखल केलेले नाही. त्याचा पगाराचा दाखला दाखल केलेला नाही. परंतु, वरील कथनांवरुन असे प्रथमदर्शनी दिसुन येते की, सामनेवाला क्र.१ यास निश्चीतच उत्पन्नाचे साधन आहे व तो अर्जदारांस अंतरिम पोटगी देण्यास पात्र आहे.

१५. मा. सर्वोच्च न्यायालयाने <u>**राजनेश विरुध्द नेहा व इतर फौजदारी अपील क्र.७३०/२०२० मधील दिनांक ०४/११/२०२० चा निकाल**</u> या खटल्यामध्ये अंतरिम व कायमची पोटगी रक्कम ठरविताना कोणकोणत्या गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहे याबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देशांनुसार पोटगीची रक्कम निर्धारित करताना न्यायालयाने पत्नी व मुलांच्या आवश्यकतेनुसार उभय पक्षकारांचे राहणीमान, शैक्षणिक पात्रता, अर्जदाराचे स्वतःचे उत्पन्न व सामनेवाला यांचे स्वतःचे उत्पन्न या गोष्टींचा विचार करणे गरजेचे असते असे नमुद केलेले आहे. सामनेवाला तर्फे वकिलांनी असे कथन केले की सामनेवालाची परिस्थिती पाहता त्याच्यावर त्याच्या आईवडीलांची देखील जबाबदारी आहे. त्यामुळे सदर गोष्टींचा विचार अंतरिम पोटगी मंजूर करताना व्हावा. सबब, उभय पक्षकारांचे राहणीमान, शैक्षणिक पात्रता, उभय पक्षकारांचे उत्पन्नाचे साधन इत्यादी बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. सद्य परिस्थितीत जिवनावश्यक वस्तू जसे की, अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, वैद्यकीय सेवा यांची वाढती महागाई पाहता सर्वसाधारण माणसाला कमीत कमी दरमहा २ ते ५ हजार रुपये खर्च करावे

लागतात. प्रस्तुत प्रकरणातील सामनेवाला क्र.१ याचे उत्पन्न, त्याच्यावर असलेली आईवडीलांची जबाबदारी तसेच अर्जदारास जीवन जगण्यासाठी जिवनावश्यक वस्तूंवर करावा लागणारा खर्च इत्यादी बाबींचा विचार करता सामनेवाला क्र.१ ने अर्जदार क्र.१ हिस दरमहा रक्कम रुपये ३,०००/- व अर्जदार क्र.२ हिस दरमहा रक्कम रुपये २,०००/- इतकी अंतरीम पोटगी देणे न्यायोचित होईल.

१६. मा. सर्वोच्च न्यायालयाने **राजनेश विरुध्द नेहा व इतर फौजदारी अपील क्र.७३०/२०२० मधील दिनांक ०४/११/२०२० चा निकाल** या खटल्याकामी असे निर्देश दिले आहेत की, अंतरिम पोटगीची रक्कम ही अर्जदाराला अर्ज दिलेल्या तारखेपासुन द्यावी. त्यामुळे अर्जदार ही अंतरिम पोटगीची रक्कम ही अर्ज दाखल दि.१४/१२/२०२३ पासून मिळण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिला दरमहा रुपये ३,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन हजार) व अर्जदार क्र.२ हिला दरमहा रुपये २,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन हजार) ही अंतरिम पोटगी म्हणून मुळ अर्जाचा निकाल होईपर्यंत किंवा या न्यायालयाच्या पुढील आदेश होईपर्यंत द्यावी. सदरची पोटगीची रक्कम ही अर्ज दाखल दि.१४/१२/२०२३ पासून अर्जदारांना द्यावी.

३. सदर आदेशाची प्रत उभय पक्षकारांना मोफत देण्यात यावी.

ANIL SITARAM SATOTE
Digitally signed by ANIL SITARAM SATOTE
Date: 2024.11.11 18:28:27 +0530

श्रीवर्धन (ए. एस. साटोटे)
दिनांक – ११/११/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, श्रीवर्धन